# उच्चशिक्षित युवकाची शेतीक्षेत्रातील उत्तुंग भरारी

**श्री. भरत गि. टेमकर**
उद्यानविद्या विशेषज्ञ,
कृषि विज्ञान केंद्र, नारायणगाव.
मो. नं. : ९४२२५१९१४३

| | | |
|---|---|---|
| नाव | :- | श्री. गणेश रामभाऊ आमले |
| पत्ता | :- | मु. पो. डिंगोरे, आमले शिवार, ता. जुन्नर, जि. पुणे. |
| मो.नं. | :- | ९०२१०३२६८१ |
| शिक्षण | :- | M.B.A. Finance |
| वडिलोपार्जित | :- | ५.५ एकर |

उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर शेती क्षेत्राची आवड असल्यामुळे शेती करण्यास सुरूवात केली. आई, वडिलांच्या मदतीने शास्त्रशुद्ध पद्धतीने शेती करण्यास सुरूवात केली. खंडाने ७.५ एकर शेती घेतली. ४ कायम स्वरूपी कामगार, यांच्या मदतीने ४ एकर ऊस, ४ एकर केळी, टोमॅटो, वाटाणा, फुलकोबी या नगदी पिकांचे उत्पादन घेत आहेत.

**सिंचनासाठी ठिबकसिंचन प्रणालीचा वापरः**

गणेश आमले यांच्या १३ एकरावरील सर्व पिकांना ठिबक सिंचनाने पाणी दिले जाते आणि विद्राव्य खतांचा वापर केला जातो. १३ एकर क्षेत्राला ३ विहिरीमधून पाणी पुरवठा केला जातो आहे.

**केळी पिकाची निवड :**

काळी, कसदार जमिनीमध्ये केळीचे उत्पादन चांगले येते. या निरिक्षणातून केळी लागवड करण्याचे ठरविले. मागील ३-४ वर्षांपासून डिंगोरे (ओतूर) परिसरामध्ये करपा व विषाणुजन्य रोगांच्या प्रादुर्भावामुळे केळीचे क्षेत्र घटलेले होते. उतीसंवर्धन पद्धतीने केळीच्या रोपांच्या निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी देखील या परिसरामध्ये केळी रोपांची विक्री बंद केलेली होती. अशा परिस्थितीतही गणेश आमले यांनी ४ एकर क्षेत्रावर केळी लागवड करण्याचा निर्णय घेतला.

**रानाची पूर्वतयारी :**

खंडाने घेतलेल्या जमिनीमध्ये ४ एकर क्षेत्रावर केळी लावण्याचे ठरविले. जमिनीचे माती परिक्षण केले असता, जमिनीतील सेंद्रिय कर्बाची आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचे प्रमाण कमी असल्याचे आढळले म्हणून

एकरी १ ट्रक (१० टन) शेणखत अणि १ ट्रक लेंडीखत वापरले. त्याचबरोबर २०० किलो निंबोळी पेंडीचा वापर केला.

केळी रोपांची लागवडीनंतर १ महिन्याने हिरवळीचे खत म्हणून दोन ओळींमध्ये तागाची पेरणी केली. दीड महिन्यानंतर हा ताग फुलोऱ्यापूर्वी जमिनीमध्ये गाडला.

जैन इरिगेशन कंपनीकडून ५२५० उतीसंवर्धीत जी-९ जातीची केळी रोपे आणून दि. २/०९/२०१४ रोजी ४ एकरामध्ये लागवड केली. प्रति रोप १४ रू दराने रोपे पोहोच मिळाली.

**रोपांची लागवड :**

६'X६' फूट अंतरावर रोपांची लागण केली. ४ एकर क्षेत्रावर ठिबक सिंचनाची सोय केली. त्यासाठी २ लाख रूपये खर्च आला. माती परिक्षण अहवालाचा अभ्यास करून बेसल लेस ठरविला. रासायनिक खतांचा संतुलित वापर केला. कोरोमंडल कंपनीच्या २४ : २४ : ० या सल्फरयुक्त खताचा वापर केला. प्रति एकर २ बॅग वापरले.

रोपे लागवडीनंतर - हयुमिक ॲसिड, क्लोरोपायरीफॅस, कार्बेन्डझिंक याची आळवणी केली. त्यानंतर पुन्हा ३ आठवडयांनी ह्युमिक ॲसिड व कुलविक, अमायोॲसिड व सी वीड युक्त थ्रि इन वन ह्यांची आळवणी केली.

रोप लागवडीनंतर दुसऱ्या महिन्यांपासून ईसाबीऑन-एल प्रति एकर / लीटर अशा पद्धतीने प्रति एकर ठिबकमधून सोडले. यामध्ये ६५ प्रकारची अमिनो ॲसिड असतात.

**विद्राव्य खतांचा वापर :**

दाणेदार खतांमुळे जमिनीची क्षारता वाढते व त्यापासून म्हणावी अशी अन्नद्रव्ये मिळत नाहीत, या अनुभवामुळे विद्राव्य खतांचा वापर करण्याचे ठरविले.

१९:१९:१९, कॅल्शियम नायट्रेट, फॉस्पोरिक ॲसिड यांचा वापर केला.

रोपे लागवडीनंतर पाऊस जास्त प्रमाणात लागून राहिला होता. शेतामध्ये पाणी साचून राहिल्याने रोपांचे नुकसान होऊ नये म्हणून प्रती एकर १०० किलो आमोनियम सल्फेट खताचा वापर केल्यामुळे रोपांची वाढ जोमदार झाली.

चौथ्या महिन्यामध्ये १३ : ० : ४५ व ० : ५२ : ३४ या खतांचा वापर सुरू केला. तसेच प्रती एकर २५ किलो कॅल्शियम नायट्रेट खताचा वापर केला.

बागेमध्ये वेल सुरू झाल्यानंतर ० : ५२ : ३४, १३ : ० : ४५ ही खते १ किलो प्रती एकर प्रती दिन देण्यास सुरूवात केली.

## एकात्मिक किड-रोग नियंत्रणाचा अवलंब

**पिक संरक्षण :**

रोपे लावल्यानंतर शेताच्या चारही बाजूंनी हत्तीगवताची लागवड केली. त्यामुळे संरक्षक अशी सजीव हिरवी भिंत बागेमध्ये तयार झाली.

पोंगासड होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक अशी बोर्डो मिश्रणाची आळवणी केली.

रोप लावल्यानंतर १ महिन्यामध्ये केवडाग्रस्त, विषाणूजन्य रोपे उपटून काढून त्याठिकाणी चांगल्या रोपांची लागण केली त्यामुळे नवीन रोपे इतर रोपांच्या वाढीच्या वेगानेच वाढू लागली.

याचा फायदा पुढे काढणीच्या वेळी आला. ३२०० रोपांपैकी ११०० रोपांवरील घडाची कापणी एकाचवेळी आली. म्हणजेच ९५% माल एकाचवेळी तयार झाला.

कमळफूल कापल्यानंतर घडावर बावीस्टीनची फवारणी केली. त्यानंतर पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेट + युरिया + स्टीकर याची फवारणी घडावर केली.

त्यानंतर १ ग्रॅम जीए+ १०० मि.ली. डबल (गोदरेज) प्रती ५० लीटर पाणी अशी फवारणी केली.

त्यानंतर फुलकिडींपासून उन्हापासून हयाचे संरक्षण करण्यासाठी स्कर्टिंग बॅगचा वापर केला.

**केळी-शेतीशाळेचा फायदा**

वर्ग २०१२-१३ मध्ये आमले शिवारामध्ये संत गजानन महाराज मंदिर सभामंडपामध्ये आत्मा योजनेअंतर्गत केळीवरील शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कृषि विज्ञान केंद्र नारायणगाव यांचे वतीने ही शेतीशाळा आठवडयातून एकदा यायंकाळी घेणेत आली. उद्यानविद्या विषयतज्ञ श्री.भरत टेमकर व कृषि विज्ञान केंद्राच्या इतर शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना केळी लागवडी संदर्भाने मार्गदर्शन केले.

केळीसाठी योग्य जाती, लागवड पद्धती, खत व्यवस्थापन, किड-रोग व्यवस्थापन, काढणी व काढणीपश्चात तंत्रज्ञान आणि केळीवरील प्रक्रिया उद्योग या बाबींवर शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली.

यावेळी केळीच्या घडाच्या संरक्षणासाठी स्कर्टिंग बॅगचा वापर कसा करावा याचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना करून दाखविण्यात आले. हे प्रात्यक्षिक गणेश आमले यांचे चांगलेच लक्षात राहिले आणि म्हणूनच त्यांनी आपल्या केळी बागेमध्ये स्कर्टिंग बॅगचा वापर करावयाचे ठरविले.

**स्कर्टिंग बॅगचे फायदे :**

- फुलकिडीचा प्रादुर्भावामुळे काळे डाग पडण्याचे प्रमाण कमी झाले.
- उन्हापासून घडाचे संरक्षण झाले.
- आठ दिवस अगोदर घड कापणीसाठी तयार झाले.
- फळांची गुणवत्ता, चकाकी, फुगवण वाढली.
- निर्यातक्षम गुणवत्तेची फळे मिळाली.

केळीबागवान श्री. राहूल महेंद्र डुंबरे मु.पो. ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे (मो.नं. ९८९०८८२१३०)

गणेश आमले यांचे ४ एकरातील सर्व माल मी घेतला. आजअखेर ३००० घड मी घेतलेले आहेत. त्यांचे वजन सरासरी ४०-५० किलो होते. स्कर्टिंग बॅगचे वापरामुळे निर्यातक्षम गुणवत्तेच्या केळीच्या फण्या मिळाल्या. मुंबईच्या व्यापाऱ्यांकडून या मालासाठी खूप मागणी होत आहे. ३००० घडांपासून १४६ टन माल निघालेला आहे.

इतर केळी उत्पादकांमध्ये गणेश आमले यांचे केळीच्या प्रति किलो १ रूपया जादा दर दिलेला आहे.

**कृषिविभागाचे सहकार्य :**

चार एकरावरील केळीसाठी ठिबक सिंचनासाठी अनुदान मिळणेकरिता प्रस्ताव तयार करण्यासाठी ओतूर मंडल कृषि कार्यालयाचे कृषि सहाय्यक श्री. राठोड यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या प्रयत्नामुळे वर्षाच्या आत प्रति एकर रूपये १६०००/-एवढे अनुदान मिळाले.

तसेच मंडल कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले. ५०% दरामध्ये निंबोळी पेंड, झिंक, मॅग्नेशियम, गंधक, बोरॉन एस-९ कल्चर, अॅझेटो, पी.एस.बी., रायझोबियम, पॅसिलोमायसिंस कृषि विभागातून मिळाले.

**कृषि विज्ञान केंद्राचे योगदान :**

ग्रामोन्नती मंडळ कृषि विज्ञान केंद्र नारायणगाव येथील शास्त्रज्ञांनी वेळोवेळी केळी बागेला भेट देऊन मार्गदर्शन केले. यामध्ये उद्यानविद्या विषयतज्ञ श्री. भरत टेमकर व पीक संरक्षणतज्ञ श्री. संतोष सहाणे यांचा मोलाचा वाटा होता. खताचे डोस ठरविले. फवारणीचे कोष्टक तयार करण्यासाठी त्यांनी मदत केली.

राष्ट्रीय फलोद्यान अभियानाअंतर्गत अनुदानावर केळी घडासाठी स्कर्टिंग बॅगचा पुरवठा कृषि विज्ञान केंद्राने केला तसेच केळी घडांची गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेटची घडावर फवारणीचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले.

**जैविक पद्धतीचा अवलंब :**

जमिनीचे माती परिक्षण केल्यानंतर सुक्ष्म अन्नद्रव्ये व सेंद्रिय कर्ब कमी असल्याचे आढळले. जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढवण्याकरिता प्रति एकर १ ट्रक शेणखत व १ ट्रक लेंडीखताचा वापर केला. तसेच ही सेंद्रिय खते चांगली कुजण्यसाठी एस-९ कल्चर चा वापर केला.

त्याचबरोबर पॅसिलोमायसिस, अॅजेटोबॅक्टर, रायझोबियम, स्फुरद विरघळवणारे जिवाणू यांचा वापर केला.

तसेच तागाचे आंतरपिक घेऊन तो जमिनीमध्ये गाडून हिरवळीचे खत शेताला दिला.

अमायनोॲसिड, हयुमिक ॲसिड, सी वीड एक्सट्रॅक्ट यांचा वापर फायद्याचा ठरला.

**आर्थिक ताळेबंद** :

चार एकरासाठी प्रतिरोप १४ प्रमाणे उतीसंवर्धित रोपांसाठी ७२०००/- रू. खर्च आला. ठिबकसाठी २ लाख रूपये, बेसल डोससाठी ६००००/-, विद्राव्य खतांसाठी ३ लाख रूपये रोपांचा लागवड खर्च रू. १.५ लाख.

व्यापाऱ्यांनी जागेवर येऊन प्रति किलो रू. ८/- दराने केळी खरेदी केली. त्यामुळे विक्री खर्च, हमाली, तोडाई, दलाली वाचला. आजअखेर ४ एकरातील ६०% माल विक्री झाला असून त्यापासून २२५ टन मालाचे रू. १२ लाख मिळालेले आहेत. उर्वरित ४० % मालापासून ८ लाख रूपये मिळणे अपेक्षित आहे.

**टोमॅटो पिकातही विक्रमी उत्पादन** :

पाऊण एकर क्षेत्रावर सिजेंटा कंपनीच्या १०५७ जातीच्या रोपांची लागवड १ मार्च २०१५ रोजी केली. ऊसाचे पाचट कुटी करून त्यावर कंपोस्ट कल्चर टाकले व जमिनीत गाडले. दोन बेडमधले अंतर ६ फूट ठेवले.

गादीवाफा व मल्चिंग पेपर व ठिबक सिंचनाचा अवलंब केला. पतंजली ॲग्रोच्या सेंद्रिय खतांचा वापर केला. २५ एप्रिल पासून १३ ऑगस्ट पर्यंत एकूण २८०० कॅरेट टोमॅटोचे उत्पादन मिळाले.

म्हणजेच ३१ गुंठे क्षेत्रातून ५६ टन टोमॅटोच उत्पादन मिळविले. सरासरी २०० रूपये प्रती कॅरेट बाजारभावाने रू. ६ लाखांचे उत्पन्न त्यांना मिळाले.


28 03 2013



